# पुणे महानगरपालिका
## वृक्ष प्राधिकरण
### जाहीर प्रकटन

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (सुधारणा २०२१) , महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्षसंरक्षण व वृक्षसंवर्धन नियम २००९ व मे.उच्च न्यायालय,मुंबई यांनी जनहित याचिका क्र.९३/२००९ मध्ये दिनांक २०/०९/२०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार मा.वृक्ष प्राधिकरण समितीवर कमाल ७ (सात) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्यासाठी खालील पात्रताधारकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| (अ) बिनसरकारी संघटनाचे प्रतिनिधी | (ब) निवृत्त शासकीय अधिकाऱ्यांपैकी तज्ञ व्यक्तीं |
|---|---|
| १) कृषी/वन/उद्यान विद्या शास्त्राची पदवी/पदविका असणाऱ्यांना प्राधान्य.<br>२) वृक्ष प्राधिकरण समितीवर बिनसरकारी संघटनेच्या प्रतिनिधीच्या नामनिर्देशनासाठी, सदर व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत बिनसरकारी संघटनेचा सक्रीय सदस्य असणे आवश्यक आहे.<br>३) वृक्षांचे रोपण, जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व किमान १० वर्षांचा समृद्ध अनुभव असलेल्या बिनसरकारी संघटनेचा प्रतिनिधी.<br>४) संस्थेवर व नामनिर्देशित करण्यासाठी शिफारस केलेल्या प्रतिनिधीवर कोणताही फौजदारी गुन्हा /खटला दाखल नसावा.<br>५) राष्ट्रीय पातळीवर कार्यरत बिनसरकारी संघटनांना प्राधान्य.<br>६) नामनिर्देशित सदस्य स्वतंत्र बिनसरकारी संघटनेचा प्रतिनिधी असावा. (एका बिनसरकारी संघटनेचा एकच प्रतिनिधी असणे आवश्यक) | १) सेवानिवृत्त अधिकारी भारत सरकार/महाराष्ट्र शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेतील सेवानिवृत्त राजपत्रित अधिकारी असावा.<br>२) वृक्ष लागवड, संवर्धन, हरित क्षेत्र विकसन, वनीकरण, उद्यान विद्या, कृषी, पर्यावरण संरक्षण, जैवविविधता, नगररचना, शहरी विकास या क्षेत्रातील किमान १० वर्ष अनुभव असावा.<br>३) अर्जदार शारीरिक व मानसिकदृष्ट्या समितीच्या बैठकीस व क्षेत्रिय पाहणीस उपस्थित राहण्यास सक्षम असावा.<br>४) अर्जदारा विरुद्ध कोणतीही गंभीर शिस्तभंग विषयक किंवा भ्रष्टाचाराची शिक्षा झालेली नसावी. |

| बिनसरकारी संघटनांचे प्रतिनिधी यांनी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे | निवृत्त शासकीय अधिकाऱ्यांपैकी तज्ञ व्यक्तीं यांनी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे |
|---|---|
| १) अर्जदार यांचा कायम रहिवाशी पत्त्याचा पुरावा..<br>२) अर्जदार यांचा ओळखपत्राचा पुरावा.<br>३) बिगर सरकारी संस्थेचा नोंदणी दाखला.<br>४)बिगर सरकारी संस्थेचा नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता दर्शविणारा पुरावा.<br>५) संस्थेचे नियम / उद्दिष्टे दर्शविणारे कागदपत्रे.<br>६) अर्जदारास संस्थेने अधिकृत प्रतिनिधी म्हणून नियुक्त केल्याचे पत्र/ ठराव.<br>७) संस्थेतील अर्जदाराचा सदस्यत्वाचा पुरावा.<br>८) अर्जदार यांची शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे.<br>९) बिनसरकारी संस्था राष्ट्रीय/राज्य/स्थानिक पातळीवर कार्यरत असल्यास त्याबाबतचा पुरावा.<br>१०) अर्जदार यांच्या बिनसरकारी संस्थेच्या सामाजिक वनीकरण विभाग यांचे कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.<br>११) वृक्षांचे रोपण,जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व किमान दहा वर्षे अगर अधिक प्रत्यक्ष अनुभवाच्या छायाचित्रासहीत तपशील (कामांच्या स्थळासहीत) मिळालेले प्रशस्तीपत्रक इत्यादी.<br>१२) अर्जदार हे बिनसरकारी संस्थेचा सक्रीय सदस्य असल्याबाबतचे संस्थेचे पत्र. (सदस्यत्वाचा कालावधी नमूद करणे आवश्यक)<br>१३)अर्जदार यांचे "परिशिष्ट - अ" मधील रु.१०० च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र. | १) अर्जदाराचा कायम रहिवासी पत्त्याचा पुरावा.<br>२) ओळखपत्राची प्रत.<br>३) सेवानिवृत्त आदेशाची प्रत.<br>४) सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेल्या पदाचे प्रमाणपत्र.<br>५) सेवापुस्तकातील संबंधित उतारा/ अनुभव प्रमाणपत्र.<br>६) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र.<br>७) वृक्षसंवर्धन/ पर्यावरण क्षेत्रातील अनुभवाचे प्रमाणपत्र.<br>८) संबंधित कामाचे संक्षिप्त विवरण/अहवाल.<br>९) "परिशिष्ट - ब" मधील स्वयंघोषणापत्र. |

उपरोक्त नमूद पात्रताधारकांसाठी विहित नमुन्यातील अर्ज मा.सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण कार्यालय, छत्रपती शिवाजीनगर - घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, दुसरा मजला, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून, पात्रताधारकांनी संपूर्ण भरलेले अर्ज (साक्षांकित प्रतीसह) सदरचे प्रकटन प्रसिद्ध झाल्यानंतर ८ (आठ) दिवसांचे आत (शासकीय सुट्ट्या वगळून) मा.सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण कार्यालय, छत्रपती शिवाजीनगर - घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, दुसरा मजला, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत. मुदतीनंतर येणाऱ्या अर्जाचा तसेच अपूर्ण अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

पुणे महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in या संकेतस्थळावर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्षसंरक्षण व वृक्षसंवर्धन नियम २००९ व मे.उच्च न्यायालय,मुंबई यांचे जनहित याचिका क्र.९३/२००९ मध्ये दिनांक २०/०९/२०१३ रोजीचे आदेश माहितीसाठी उपलब्ध आहेत.

❖ अधिक माहितीसाठी संपर्क - श्री.रत्नाकर करडे - सहाय्यक उद्यान अधिक्षक,वृक्ष प्राधिकरण - ९६८९९३८५२३.

12/08

**(डॉ.अशोक दि.घोरपडे)**
**सह महापालिका आयुक्त तथा**
**सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण समिती**
**पुणे महानगरपालिका**

# पुणे महानगरपालिका
## वृक्ष प्राधिकरण

# शुद्धीपत्रक

मा.वृक्ष प्राधिकरण समितीवर कमाल ७ (सात) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्यासाठी पात्रताधारकांकडून अर्ज मागविण्याकामी जाहिरात क्र.१/५५७ दिनांक १२/०८/२०२६ नुसार "दैनिक लोकमत" व "दैनिक इंडियन एक्सप्रेस" या वृत्तपत्रांमध्ये गुरुवार दिनांक १३/०८/२०२६ रोजी जाहीर प्रकटन प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

सदर जाहीर प्रकटनामध्ये (अ) बिगरसरकारी संघटनाचे प्रतिनिधी मधील अ.क्र.४ - "संस्थेवर व नामनिर्देशित करण्यासाठी शिफारस केलेल्या प्रतिनिधीवर वृक्षतोडी संदर्भांत कोणताही फौजदारी गुन्हा/खटला दाखल नसावा" असे वाचावे.

13/08/2026

(डॉ.अशोक दि.घोरपडे)
सह महापालिका आयुक्त
तथा सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण समिती
पुणे महानगरपालिका